कायम विना अनुदान तत्वावर (मराठी, हिंदी, उर्दू, तामिळ, इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/
/खा.प्रा.शा./८०/ दि.३/१०/०६

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
कै.श्री मोतीलाल गोपाळदास मथुरावाला
प्रा. वि. मंदिर नानवडी, पुणे ४०

विषय :- कायम-विना-अनुदान तत्वांवरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ~~जादा~~/नैसर्गिक वाढीचा/~~वाढीच्या माध्यम / जादा तुकड्या~~/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-१००२/ (१०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक २६ सप्टेंबर २००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या ~~जादा~~ / नैसर्गिक वाढीचा / ~~वाढीच्या माध्यम~~ / ~~जादा तुकडया~~ / वर्ग जून २००६ पासून ~~सन २००६ - २००७~~ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | मोतीलाल गोपाळदास मथुरावाला प्रा. वि. मं. नानवडी | मराठी | ३ री - २००१-०२<br>३ री - २००२-०३<br>३ री - २००३-०४ | प्रत्येकी एक (तुकडी नैसर्गिक) | मंजूर |

## अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.

२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.

३. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५. सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६. सदर शाळेच्या वर्गात / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.

७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटींवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद,पुणे करिता

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना:

१. सचिव / अध्यक्ष
महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ नानवडी, पुणे

(स्वाक्षरी)
मुख्याध्यापिका
कै.श्री. मो.गो. मथुरावाला
प्राथमिक विद्या मंदिर
नानवडी बाजार, पुणे-४०

Scanned with OKEN Scanner

॥ सत्यम् शिवम् सुंदरम् ॥

महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, वानवडी, पुणे ४० या संस्थेचे

# कै. श्री. मोतिलाल गोपाळदास मथुरावाला प्राथमिक विद्या मंदीर

वानवडी, पुणे - ४११ ०४०.



मुख्याध्यापिका
सौ. सीमा राठोड

जावक क्र.:

दिनांक : ११ / १० / २०२३

प्रति,
मा. गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, हवेली,
पुणे.

विषय :- मूळ तुकडी मान्यता पत्र नसणेबाबत,

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आमच्या कै. श्री. मोतीलाल गोपाळदास मथुरावाला प्राथमिक विद्यामंदीर, वानवडी, पुणे-४० शाळेस सन २००१-२००२ पासून इ. २री, २००२-२००३ इ. ३री, २००३-२००४ इ. ४थी याप्रमाणे प्रत्येकी एक तुकडी नैसर्गिक वाढीने माननीय शिक्षणाधिकारी (प्राथ.) पुणे यांची मान्यता मिळाली आहे. परंतु त्या पत्राची मूळप्रत शाळेकडे उपलब्ध नसल्याने त्यांची झेरॉक्स प्रत स्वमान्यता सन २०१९-२०२२ आणि २०२२-२०२५ प्रमाणपत्र मिळणेसाठी ग्राह्य धरण्यात यावी ही नम्र विनंती.

कळावे,

आपली विश्वासु

मुख्याध्यापिका
कै. श्री. मो. गो. मथुरावाला
प्राथमिक विद्या मंदीर
वानवडी बाजार, पुणे-४०.

Scanned with OKEN Scanner